FORM-1A N.C.R.B. 002

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( **Under Section 154 Cr. P.C.**)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला.लु.प्र.वि.मुं., पहिली खबर क्र. FIR No.: ०५, वर्ष Year: २०१८, दिनांक Date: ३०/०१/२०१८

2. (i) अधिनियम Act: भ्र.प्र.अधि. १९८८, कलमे Sections: १३(१)(ई) सह १३(२)
   (ii) अधिनियम Act ....., कलमे Sections .....
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections .....

3. (a) अपराधाची घटना : वार, तारीख पासून, वेळ, तारीख पर्यंत, वेळ — १६/०२/२००६ ते १५/०२/२०१२ या कालावधीत.
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: ३०/०१/२०१८, वेळ Time: १६.१० वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: ३०/१८, तारीख Date: ३०/०१/१८, वेळ Time: १६.१० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : ....., लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.: घाटकोपर, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. .....
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: —, ठिकाणाचे नंबर No. if any: —, गल्ली Ward: —, रस्त्याचे नाव Name of road: —
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place: —, गाव Village: —, पोस्ट Post: —, तालुका Taluka: —, जिल्हा Dist.: —, राज्य State: —
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station: —, तालुका Taluka: —, जिल्हा Dist.: —, राज्य State: —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: श्री. संजय नाळे
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: श्री. शंकरराव नाळे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ४५ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: —
   (e) पारपत्र क्रमांक Passport No.: —, दिल्याचा दिनांक Date of Issue: —, दिल्याचे ठिकाण Place of Issue: —, (f) व्यवसाय Occupation: नोकरी
   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste: —, जनजात Sub-Caste: —
   (h) पत्ता Address: खारघर, गल्ली / सर्व्हे नं. Ward: को.ऑ.हौ.सो., घर / नाव नं. House/Name No.: 601, फोन / मो. नं. Phone/M. No. ....., पॅन नं. PAN No. ....., वोटर्स नं. Card No. .....
   रस्त्याचे नाव Road: प्लॉट नं. 15, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place: सेक्टर-१२, गाव Village: खारघर, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.: खारघर
   तालुका Taluka: नवीमुंबई, जिल्हा Dist. ....., राज्य State ....., सध्याचा पत्ता Present Address .....

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   परमेश्वर तुकाराम कदम, आलोसे
   रा. हि. रुम नं. 109/1, ट्रान्झीट कॅम्प, ओम साई गणेश सह. गृहनिर्माण संस्था
   कामराज नगर, घाटकोपर (पु), मुं-नं. 400077.

Y.P.P.-800 Req.-(25×6=150 Lvs) 8 2016 PA3-(K) 460

यातील फिर्यादी श्री-संजय शंकरराव नाके,
स.पो.आ. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
यांचा स्वतंत्र कागदावर सविस्तर जबाब नोंद केला
असून तोच गुन्ह्याची पहिली खबर समजून नमूद
प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मी स्वत:

Karpe

(तानाजी करपे)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

**फिर्याद**

दि. ३०/०१/२०१८

श्री. संजय शंकरराव नाळे, वय ४५ वर्षे, नोकरी :– सहायक पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुं.,रा.ठि. साईअनंत को.ऑ.हौ.सोसा., फ्लॅट नं.६०१, प्लॉट नं.१५, सेक्टर नं.१२, खारघर, नवी मुंबई.

---

मी वरील प्रमाणे असून, मे २०१७ पासुन एक टप्पा पदोन्नतीने सहायक पोलीस आयुक्त या पदावर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३० येथे नेमणुकीस आहे.

अर्जदार श्री. सचिन मारुती गायकवाड, रा.ठि.एकता चाळ, ४१/४२, कामराज नगर, घाटकोपर (पुर्व) मुंबई यांनी गै.अ. श्री. परमेश्वर तुकाराम कदम, नगरसेवक, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, प्रभाग क्र. १२८, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचेविरूध्द भ्रष्टाचार करुन मालमत्ता संपादित केल्याबाबत तक्रारी अर्ज केला.

सदर अर्जास अनुसरून मा. वरिष्ठांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे गैरअर्जदार श्री परमेश्वर तुकाराम कदम यांचेविरूध्द गु.चौ.क्र. १५६/२०१० अन्वये सुरू करून त्याची चौकशी सपोआ शहाजी शिंदे यांचेकडे देण्यात आली होती व सदर चौकशी दरम्यान अर्जदार श्री सचिन गायकवाड यांनी गैरअर्जदार श्री परमेश्वर कदम यांचेविरूध्द केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य आढळुन आले. त्याव्यतिरिक्त ही गैरअर्जदार यांच्या आणखीन काही मालमत्ता असल्यास त्याची सविस्तर माहिती मिळू शकते. याकरीता गैरअर्जदार श्री. परमेश्वर कदम यांच्या विरुध्द उघड चौकशी सुरु करण्याची परवानगी मिळणेकरीता मा. अपर पोलीस आयुक्त, लाप्रवि, मुंबई यांना अहवाल सादर केला. सदर अहवालास अनुसरून दिनांक २५.०५.२०११ रोजी मा. अपर पोलीस आयुक्त, लाप्रवि यांनी मंजुरी दिली त्यास अनुसरुन दि. २५/०५/२०११ रोजी उघड चौकशी क्रमांक १७/२०११११ सुरु करण्यात आली.

मा. वरिष्ठांचे आदेशान्वये सुरु करण्यात आलेली उघड चौकशी क्रमांक १७/२०११ मध्ये खालील बाबी निष्पन्न झालेल्या आहेत.

गैरअर्जदार श्री परमेश्वर तुकाराम कदम यांचे कुटुंबात पत्नी, ०२ मुली असुन त्यांचे आई व वडील हे दोघेही सध्या गावी राहतात.

१) वडील श्री. तुकाराम गणपत कदम यांचे मुंबई येथेच जुनी ११ वी एवढे शिक्षण झालेले असुन, सन १९६० मध्ये ते बॉम्बे डाईग या मिलमध्ये नोकरीस लागले होत व सन १९९६ साली बारपर म्हणुन स्वेच्छा निवृत्ती घेउन सेवानिवृत्त झाले आहेत.

२) दिनांक १७.०५.१९९७ साली गै.अ. श्री. परमेश्वर कदम यांचे श्री. गणपत कांबळे मु.पो. लोणी भापकर ता. बारामती जि. पुणे यांची कन्या मंगल हीचेशी लग्न झाले आहे. सौ. मंगल कदम यांचे लोणी भापकर येथे इयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. सौ. मंगल कदम यांना सन २०१२ साली म.न.से पक्षातर्फे प्रभाग क्रमांक १२८ महिलांसाठी राखीव असलेल्या प्रभागामधून नगरसेवक पदासाठी उमेदवारी देण्यात येउन त्या निवडणूक जिंकल्याने माहे मार्च २०१२ ते २०१७ या कालावधीत नगरसेवीका होत्या.

३) गै.अ. श्री. परमेश्वर कदम यांना कु. अंजली वय १२ वर्षे व कु. पल्लवी वय १० वर्षे अशा दोन मुली असुन गै.अ. यांची मोठी मुलगी कु. अंजली वय १२ वर्षे ही विद्याभवन इंग्लिश प्रायमरी हाईस्कुल, घाटकोपर, मुंबई येथील हाईस्कूलमध्ये इयत्ता आठवीत व कु. पल्लवी ही नमुद शाळेतील इयत्ता सहावीमध्ये शालेय शिक्षण घेत आहेत. सदरची शाळा अनुदानीत शाळा आहे त्यामुळे सदर शाळेत मुलींना दरमहिना फक्त ८ रू एवढीच फी आहे.

समक्ष,

( तानाजी करपे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

30-01-18
Sanjay Nale / ACP

स.पो.आ. संजय शंकरराव नाळे, वय ४५ वर्षे यांची दि.३०/०१/१८ रोजीची फिर्याद पुढे चालू...

गै.अ. श्री. परमेश्वर कदम हे कामराज नगर,घाटकोपर भागामध्ये संस्थेच्या माध्यमातुन समाजसेवा करीत होते. त्यामुळे सन २००७ साली श्री. परमेश्वर कदम यांना प्रभाग क्र. १२८,घाटकोपर पुर्व येथुन मधुन महाराष्ट नवनिर्माण सेना या पक्षातर्फे नगरसेवक पदासाठी उमेदवारी देण्यात आली असून, ते माहे मार्च, २००७ मध्ये निवडणुक जिंकुन नगरसेवक म्हणुन प्रभागाचे कामकाज पाहु लागले. श्री. परमेश्वर कदम यांनी माहे मार्च २००७ ते फेब्रुवारी २०१२ या कालावधीत नगरसेवक म्हणुन प्रभाग क्र. १२८ मधुन काम केले आहे. त्यामुळे गै.अ. यांच्या विरुध्द सुरु असलेल्या उघड चौकशीचा परिक्षण कालावधी दि. १६/०२/२००७ ते दि. १५/०२/२०१२ असा ग्राहय धरण्यात आलेला आहे.

गैरअर्जदार श्री. परमेश्वर तुकाराम कदम यांचे यांनी परिक्षण कालावधी मधील उत्पन्नाचा तपशिल:—

| क्र. | (अ)— उत्पन्नाचा तपशिल | उत्पन्न रूपये |
|---|---|---|
| ०१ | नगरसेवक पदावरील महानगर पालिकेकडुन मिळालेले मानधन/भत्ते | ५,०७,६४१ |
| ०२ | ऑटो रिक्षा क्र. २३५१ व रिक्षा क्र. ८६१८ रिक्षांपासून मिळालेले उत्पन्न | १,०८,००० |
| ०३ | श्री. गोरख जयवंत दुर्गे यांचेकडुन घेतलेली उसनी रक्कम | ६,२५,००० |
| ०४ | विकासक निलम बॉम्बे फायनान्सकडुन घरभाडयाची मिळालेली रक्कम | ९९,००० |
| ०५ | भवानी सहकारी बँक लि. विद्याविहार बँकेचे घेतलेले रिक्षा वाहन कर्ज | १,५०,००० |
| ०६ | एल.आय.सी. मनी बँक पॉलीसी मिळालेला लाभांश | ३९,९४२ |
| ०७ | पोस्ट ऑफिस, बारामती मंथली स्किम मुदतपुर्ण रक्कम | १,१०,००० |
| ०८ | पोस्ट ऑफिस, बारामती मंथली स्किम व्याज रक्कम | ३७,२९६ |
| ०९ | पोस्ट ऑफिस, दादर पोस्टाचे मंथली स्किम मुदतपुर्ण रक्कम | १,९८,००० |
| १० | पोस्ट ऑफिस, दादर पोस्टाचे मंथली स्किम व्याज रक्कम | ३७,२९६ |
| ११ | देउळगाव रसाळ येथील शेतीचे उत्पन्न | १,०७,५४१ |
| १२ | जुनी रिक्षा विकीतुन आलेली रक्कम | १५,००० |
| १३ | युनियन बँकेचे व्याज | ५,५२३ |
| | **एकूण उत्पन्न रक्कम रूपये :—** | २०,४०,२३९ |

गैरअर्जदार श्री.परमेश्वर तुकाराम कदम यांनी परिक्षण कालावधी मध्ये केलेला खर्चाचा तपशिल :—

| क्र. | (ब)— खर्चाचा तपशिल | खर्च रूपये |
|---|---|---|
| ०१ | उत्पन्नातुन आयकर कपात करुन उत्पन्नाच्या ३३ टक्के शाबित न करता येणारा गृहखर्च | १,६३,७४३ |
| ०२ | भवानी सहकारी बँक लि. विद्याविहार बँक वाहन कर्ज परतफेड | ७२,३३३ |
| ०३ | वडीलांना शेतजमीनी खरेदी करण्यासाठी अदा हातउसनी रक्कम | ६,६८,००० |
| ०४ | मु.पो. देउळगाव रसाळ, ता.बारामती शेतजमीन मुद्रांक शुल्क/ नोंदणी | २,८०० |
| ०५ | मुपो देउळगाव रसाळ वडीलोपार्जीत शेतजमीन मुद्रांक शुल्क/ नोंदणी | ३३० |
| ०६ | मु.पो.देउळगाव रसाळ येथील जमीनीमध्ये झालेला खर्च | ४३,०१७ |

समक्ष,

Karpe

( तानाजी करपे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

30.01.18
Sanjay Nale/ ACP.

स.पो.आ. श्री. संजय शंकरराव नाळे, वय ४५ वर्षे यांचा दि.३०/०१/१८ रोजीची फिर्याद पुढे चालू...

| | | |
|---|---|---|
| ०७ | एल.आय.सी. मनी बॅक पॉलीसीचे अदा केलेले हप्ते | १,८२,३४९ |
| ०८ | मोबाईल वापराचा मासीक रिचार्ज खर्च | ३३,००० |
| ०९ | आयकर खात्यास अदा केलेला आयकर | १६,४१२ |
| १० | विविध कारणास्तव रोखीच्या स्वरूपात केलेला खर्च | ८,५५,९८८ |
| ११ | ॲम्ब्युलन्स इंधन व देखभाल खर्च | २०,००० |
| १२ | रिक्षा इंधन व देखभाल खर्च | २०,००० |
| | **एकूण खर्च रक्कम रूपये ........** | २०,७७,९७२ |

गैरअर्जदार श्री. परमेश्वर तुकाराम कदम यांचे यांनी परिक्षण कालावधी मधील स्थावर व जंगम मालमत्तेचा तपशिल:—

| अ.क्र | स्थावर मालमत्तेचा तपशिल | किंमत |
|---|---|---|
| ०१ | घर क्र. ४०, नम्रता चाळ, ओम साई गणेश सोसायटी, कामराज नगर घाटकोपर (पु) मुंबई वडीलोपार्जित हिश्यातुन मिळालेली खोली. | ०० |
| ०२ | मु.पो.देउळगाव रसाळ, ता.बारामती जि.पुणे येथील वडीलोपार्जित हिश्श्यातुन मिळालेली शेतजमीन | ०० |
| ०३ | मु.पो.देउळगाव रसाळ,ता.बारामती जि.पुणे येथील गट क्रमांक ६९५ अन्वये २० गुंठे खरेदी केलेली शेतजमीन | ५०,००० |
| **अ.क्र** | **जंगम मालमत्तेचा तपशिल** | **किंमत** |
| ०१ | पत्नी सौ. मंगल कदम हिचेकडे स्त्रीधन म्हणून असलेले स्त्रीधन साडेपाच तोळे सोने | ०० |
| ०२ | रिक्षा क्र. एम.एम.०३ एके ८६१८ ची किंमत | १,५०,००० |
| ०३ | ॲम्ब्युलन्स क्रमांक एम.एच.०३.ए एच.३०७४ खरेदीसाठी दिलेली रक्कम | २,६६,१२२ |
| ०४ | युनियन बॅक ऑफ इंडिया खात्यामधील शिल्लक रक्कम | १,६८४ |
| ०५ | बॅक ऑफ महाराष्ट खात्यातील शिल्लक रक्कम | ५१२ |
| ०६ | वरुण कॉ.आप केडीट सोसायटीतील शिल्लक रक्कम | २,२५० |
| ०७ | घरगुती वापरातील साहित्य, विद्युत उपकरणे, फर्निचर व इतर सामान | ५५,००० |
| ०८ | नोकीया कपनीचा मॉडेल क्रमांक ई—६३ हॅडसेट | ९,००० |
| ०९ | पत्नीचा नोकीया कंपनीचा मोबाईल | २,५०० |
| १० | गैरअर्जदार यांचे नाकारलेले उत्पन्न | ७,३९,१०७ |
| | **एकूण स्थावर व जंगम मालमत्ता...** | १२,७६,१७५ |

समक्ष,

(signature)

( तानाजी करपे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

(signature) 30.01.18
Sanjay Nale/ACP

स.पो.आ. संजय शंकरराव नाळे, वय ४५ वर्षे यांची दि.३०/०१/१८ रोजीची फिर्याद पुढे चालू...

परमेश्वर तुकाराम कदम यांचे अपसंपदेचा तक्ता :-

| अ.क्र. | तपशिल | | रूपये |
|---|---|---|---|
| ०१ | दि. १६/०२/२००७ ते १५/०२/२०१२ रोजीची मालमत्ता | (स्टेटमेंट–ब) | १२,७६,१७५ |
| ०२ | परिक्षण कालावधी पुर्वी असलेली मालमत्ता | (स्टेटमेंट–अ) | ४,४८९ |
| ०३ | परिक्षण कालावधी दरम्यान धारण केलेली मालमत्ता | (स्टेटमेंट ब–अ) | १२,७१,६८६ |
| ०४ | परिक्षण कालावधी दरम्यानचा खर्च | ( स्टेटमेंट–ड ) | २०,७७,९७२ |
| ०५ | परिक्षण कालावधी दरम्यानची एकुण मालमत्ता व खर्च | ( ३ + ४ ) | ३३,४९,६५८ |
| ०६ | परिक्षण कालावधी दरम्यानचे एकुण उत्पन्न | (स्टेटमेंट ' क) | २०,४०,२३९ |
| ०७ | एकुण अपसंपदा | ( ५ – ६ ) | १३,०९,४१९ |
| ०८ | अपसंपदेची टक्केवारी = अपसंपदा X १०० / एकुण उत्पन्न | | ६४.१७ टक्के |

एकंदरित उघड चौकशी वरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, लोकसेवक गैरअर्जदार यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडुन मिळणारे निव्वळ मानधन तसेच शेती उत्पन्न, रिक्षा उत्पन्न व विकासकाकडुन मिळालेले भाडे उत्पन्नाव्यतिरिक्त कोणतेही कायदेशीर स्वरूपाचे स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नसल्याने लोकसेवक गैरअर्जदार श्री. परमेश्वर कदम यांनी संपादीत केलेल्या अपसंपदेचा तक्ता व अपसंपदेची टक्केवारी वर नमुद केलेप्रमाणे आहे.

एकंदरीत सदर प्रकरणात केलेल्या सविस्तर उघड चौकशीमध्ये गै.अ. श्री. परमेश्वर तुकाराम कदम, नगरसेवक, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, प्रभाग क्र. १२८, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना सर्व प्रकारच्या ज्ञात स्त्रोतातून मिळालेले उत्पन्न एकूण रक्कम रु. २०,४०,२३९/– इतके असून त्यांनी नमुद परिक्षण कालावधीमध्ये रु. १२,७६,१७५/– किंमतीची स्थावर व जंगम मालमत्ता धारण केलेली आहे. एकंदरीत त्यांनी धारण केलेली मालमत्ता व खर्च पाहता रू ३३,४९,६५८ /– इतका आहे. त्यांनी धारण केलेल्या मालमत्ता व त्यांनी खर्चामधुन त्यांचे एकुण उत्पन्न वजा जाता एकुण रू १३,०९,४१९/– ची अपसंपदा बाळगलेचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.

त्यामुळे सदर उघड चौकशीत गै.अ. श्री. परमेश्वर तुकाराम कदम, नगरसेवक, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, प्रभाग क्र. १२८, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्या नमुद ज्ञात उत्पन्नाच्या मानाने ६४.१७ टक्के अपसंपदा आढळून आलेली आहे.

तरी गै.अ. श्री. परमेश्वर तुकाराम कदम (नगरसेवक, बृहन्मुंबई मनपा) यांनी दिनांक १६/०२/२००७ ते दिनांक १५/०२/२०१२ दरम्यानच्या कालावधीत त्यांच्या ज्ञात उत्पन्नापेक्षा विसंगत अशी रक्कम रु **१३,०९,४१९/–** इतकी अपसंपदा संपादित केल्याचे आणि तिची टक्केवारी **६४.१७ टक्के** असल्याचे निष्पन्न झाले आहे. गै.अ. परमेश्वर कदम यांनी भ्र टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम १३(१)(ई) सह १३(२) प्रमाणे गुन्हा केला आहे. सबब माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

माझी फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

Karpe

( तानाजी करपे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

30.01.18
Sanjay Nale/ACP

4

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ उघड चौकशीवरून [illegible]

Reasons for delay in reporting by the Complainant/Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........ –

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकुण मूल्य ........ –

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ –

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील लोकसेवक परमेश्वर तुकाराम कदम यांनी त्यांचे नगरसेवक पदाच्या कालावधीतील परिक्षण कालावधी दि. १६/०२/२००७ ते दि. १५/०२/२०१२ या कालावधीत त्यांच्या ज्ञात व कायदेशीर उत्पन्नाच्या साधनांशी विसंगत अशी ६४.१७% अशी अपसंपदा बाळगली म्हणून त्यांनी कलम १३(१)(ई) सह कलम १३(२) भ्र.प्र.का. सन १९८८ अन्वये गुन्हा केला आहे वगैरे मजकुराचे 'फि' वरुन गुन्हा नोंद करणेत आला आहे.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

स. पो. आ. तानाजी करपे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P. S. ........ District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.) [signature] 30.01.13

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature] Karpe
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ........ तानाजी करपे
पदनाम Rank ........
तपासिक अं. चा कोड क्र. स. पो. आ.
Posting
Code No. of I. O. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**